# प्रकरण पाचवे

# उपसंहार

प्रस्तुत प्रबंधिकेत शंकर पाटलांच्या कथेतील स्त्री जीवनाचे चित्रण हे पाहण्याचा प्रयत्न केला आहे. त्यासाठी प्रथम ग्रामीण कथेची परंपरा या प्रकरणामध्ये ग्रामीण साहित्याची सुरुवात, ग्रमीण-नागर भेद, ग्रामीण कथेचा आरंभकाळ, परिवर्तन काळ आणि वळण हे विवेचन पहिल्या प्रकरणामध्ये केले आहे.हे विवेचन करताना ग्रामीण कथेतील प्रमुख लेखक यांचाही अभ्यास केला आहे.

ग्रामीण साहित्याचा १८२० ते १८७० हा प्रबोधनाचा काळ. १८८० च्या प्रबोधन काळापासून ग्रामीण साहित्य विकसित झाले. याच कालखंडात खऱ्या अर्थाने ग्रामीण कथा वाङ्मयाची निर्मिती झाली. ग्रामीण जीवनातील प्रथम स्थान हरिभाऊ आपटे यांना जाते. याच कालखंडात 'करमणूक' व 'मनोरंजन' या दोन मासिकांचा उदय झाला. ग्रामीण साहित्याची सुरुवात पाहत असताना ग्रामीण व नागर भेद या विषयी थोड्क्यात पाहिले आहे. समाजाचे सांस्कृतिक स्वरूप आणि पातळी यांना अनुलक्षून ग्रामीण व नागर असा भेद पाहिला आहे.

ग्रामीण कथेचा उगम म्हणून प्रथम 'काळ तर मोठा कठीण आला' या हरिभाऊ यांच्या कथेला जातो.यामध्ये दुष्काळात झालेल्या शेतकऱ्याची परिस्थितीचे हृदयद्रावक चित्रण त्यांनी या कथेत केले आहे. १९२० नंतर ग्रामीण कथेला स्वत:चे अधिष्ठान निर्माण झाल्याचे दिसून येते. राजकीय परिस्थितीतील झालेल्या स्थित्यंतराचा परिणाम सामाजिक दृष्टीवर झाला. टिळक युगाचा

अंत होता महात्मा गांधींचा प्रभाव पडू लागला. गांधीजींनी खरा भारत खेड्यात आहे. हे सांगण्यासाठी 'चला खेड्याकडे' असा संदेश दिला आणि सर्वांची दृष्टी खेड्यातील लोकांच्याकडे गेली. खेडे, खेड्याचा परिसर निसर्ग दर्शन घडवून नाविन्याचा प्रत्यय देत वाचकांचा कुतूहल जागवणारा लेखक वर्ग निर्माण केला. ग्रामीण कथेला वळणसुद्धा याच कालखंडात मिळाले.

ग्रामीण कथेची परंपरा पाहत असताना ग्रामीण कथेतील प्रमुख लेखक यांचे साहित्य मांडले आहे. हरिभाऊ यांच्या अभ्यासाबरोबर वि. स. सुखटणकर यांच्या साहित्याचा अभ्यास केला आहे. त्यांच्या 'सह्याद्रीच्या पायथ्याशी'हा कथासंग्रह. यामध्ये ग्रामीण परिसर, हेवेदावे, भांडणे, अंधश्रद्धा, स्त्रियांची मनोवृत्ती असे विषय त्यांच्या कथांतून येतात. यानंतर लक्ष्मणराव देसाई यांचे 'कल्पवृक्षाच्या छायेत' यासारख्या कथा पाहिल्या. शिवाय श्री. म. माटे यांच्या 'उपेक्षितांचे अंतरंग', 'माणुसकीचा गहिवर' यामधील ग्रामीणतेचा अभ्यासाचा थोडक्यात आढावा घेतला आहे. ग. ल. ठोकळ यांनी जीवनातील चित्तथरारक अनुभव ग्रामीण कथेत मांडला आहे. र. वा. दिघे, म. भा. भोसले यांचासुद्धा ग्रामीण कथेच्या परंपरेत हातभार दिसतो. म. भा. भोसले यांनी ग्रामीण जीवनातील लहानसहान समस्यांची मांडणी व सुशिक्षितांची सामाजिक जाणीव ही वैशिष्ट्ये घेऊन कथा लेखन केले.

मराठी ग्रामीण साहित्यात १९४५ नंतर मराठी साहित्यात नवकथेचा उदय झाला. या कालखंडात नवकथाकार पैकी व्यंकटेश माडगूळकर यांनी 'माणदेशी माणसं', 'हस्ताचा पाऊस', 'उंबरठा'

या कथासंग्रहातून ग्रामीण जीवनाबरोबर तेथील स्त्रियांच्या मनस्थितीचे चित्रण केले आहे. द. मा. मिरासदारांनी 'विरंगुळा', 'भोग', 'गवत' या कथातून दारिद्र्य, दु:खद् जीवन कथेत मांडले आहे. स्त्री जीवनाचा मानवी मनाचा सूक्ष्म वेध घेण्याचा प्रयत्न केला. शंकर पाटील यांनी 'वळीव', 'उन', 'भेटीगाठी', अशा कथासंग्रहातून घेतला आहे. ग्रामीण जीवनातील स्त्री ही अत्यंत संवेदनशीलतेने चित्रित केली आहे. 'वेणा', 'वळीव', 'आतंड', 'चिंधी', 'घालमेल' अशा कथातून ग्रामीण माणसांच्या जीवनाचा आकांत मांडतात. शंकर पाटील यांची कथा बहुरंगी, बहुढंगी आहेत. यानंतर रणजित देसाई यांनीही कथा लेखन केले आहे.

ग्रामीण कथेच्या परंपरेत दलित लेखकांनीही काही ग्रामीण कथा लिहिल्या आहेत. यामध्ये अण्णाभाऊ साठे, शंकरराव खरात यांनी ग्रामीण जीवन रेखाटले आहे. यामध्ये उद्धव शेळके यांनी 'शिळान अधिक आठ कथा', 'वानगी', 'गरिबाघरची लेक', 'कडूनिंबाची सावली' या कथंसंग्रहातून वैदर्भीय जीवनाबरोबर स्त्री जीवनाचे चित्रण मांडले आहे. ग्रामीण जीवनाशी जवळचे नाते असणारे रा. रं. बोराडे यांनी ग्रामीण जीवन कथेमध्ये, खेड्यातील होणारी स्त्रियांची कुचंबना, ओढातान, मूकवेदना, सोशिकता आणि दु:खाचे चित्रण 'पेरणी', 'मळणी', 'नाती गोती' कथासंग्रहात मांडले आहे.

यानंतर आनंद यादवांनी यांनी शेतकऱ्यांच्या जीवनातील दु:ख, कष्टमय जीवन, स्त्रियांचे दु:ख या संबंधीचे चित्रण 'खळाळ' या कथासंग्रहामधून येतो. समाज, शेती, पुरुष, स्त्रियांचे वैशिष्ट्यपूर्ण चित्रण केले आहे. त्यानंतर महादेव मोरे व चारुता सागर या कथाकारांचा उल्लेख येतो. महादेव मोरे यांचा 'दवना' हा कथासंग्रह प्रादेशिकतेची जाणीव देतो. त्यांच्या 'झुंज' 'इंगित' अशा कथातून ग्रामीण कथातून वास्तव चित्रण मांडले आहे. चारुता सागर यांनी 'नागीन' या

कथासंग्रहात जाती-जमातीचे प्रत्ययकारी चित्रण येते. तर भास्कर चंदनशिव यांनी विशेषत: 'मरणकळा', 'जाभंळढव्ह', 'अंगारमाती' या कथासंग्रहातून दुष्काळ, परंपरा, दारिद्र्य, दलित, स्त्री यावर होणारे अत्याचार, विकृत वासनेचे लिंगपिसाटपण, काबाडकष्ट करणारी स्त्री या विषयीचे चित्रण त्यांच्या कथेत येते.

दुसऱ्या प्रकरणामध्ये शंकर पाटील यांच्या कथेचे स्वरूप पाहिले आहे. त्यामध्ये शंकर पाटील यांच्या जीवन व साहित्याचा परिचय पाहिला आहे व कथांची वैशिष्ट्ये पाहिले आहे. शंकर पाटील यांची पहिली कथा १९४९ च्या 'वसंत' मासिकामध्ये 'रामाच्या पाऱ्यामंदी' या नावाने प्रसिद्ध झाली. पाटील यांची प्रारंभीची कथा स्वत:ची वास्तव शोधताना दिसते. नाट्यात्मक अभिव्यक्ती हे पाटलांचे फार मोठे सामर्थ्य असल्याने नवकथाकार व विनोदी कथाकार या नावाने प्रसिद्ध झालेले दिसतात. मराठी कथेमध्ये ग्रामीण मनांचा उलगडा करतात. माणसा माणसातील परस्परसंबंध व गुंतागुंत कुटुंबातील माणसाची नाती अशा व्यक्ती मनाचा शोध घेत कथा ग्रामीण वाङ्मयात आली आहे. विनोदी कथा ग्रामीण कथा यातून विविधता दर्शवते. पाटील यांनी परिवर्तनाचे भान ठेवून कथा लेखन केले आहे. दु:ख, वास्तवता, मानवी मनाची जडणघडण, निसर्ग, कुटुंब नाती आदी विषयातून त्यांची कथा साकारताना दिसते.

मनावरील ताण, मनावर पडलेला दबाव, मानसिक तणावामुळे होणाऱ्या घटना, प्रसंग व त्या रूपात रूपात घडणारी कथा शंकर पाटील यांनी लिहिली आहे. 'प्रतीक्षा', 'भुजंग', 'वळीव', 'वेणा' या कथामध्ये मानसिक तणावाचे परिणामकारक चित्रण मांडले आहे. व्यक्ती हा घटक समजून त्यांच्याशी संबंधित येणारा नातेसंबंध यांचा ताणतणाव प्रकट करतात. कौटुंबिक जीवन म्हणजे कुटुंबातील एकत्रित राहणाऱ्या माणसांचे जीवन चित्रण करतात. विशिष्ट कौटुंबिक

कथा, एकत्र कुटुंब पद्धत, पुरुषसत्ताक कुटुंब पद्धती कथेत येते. आजोबा, वडील, मुलगा, पुतण्या अशी पुरुषांच्या हातात बदलत जाणारी सत्ता, 'सारवण' व 'पान्हा' या कथेत ते मांडतात. दारिद्र्य हा कथेचा मूळ भाग आहे. दारिद्र्यातून निर्माण होणारे प्रसंग घटना यांचे चित्रण कथेत येते. विविध जातीनुसार बारा बलुतेदारांचे दारिद्र्य कथेत मांडतात. त्याबरोबर भाऊबंदकीचे चित्रण ग्रामीण जीवनाशी साजेसे केले आहे. 'नांगरट', 'भुजंग', टिपशीन' या कथांमधून एकेमेकांच्या आधारावर गाव चालतो. त्यामध्ये त्यांना एकत्र आणणं ही भावना कथेत मांडली जाते. अंधश्रद्धा ही पाटलांच्या कथेला वेगळे रूप देणारी ठरते. कितीही समाज सुधारला तरीसुद्धा अंधश्रद्धेचे, रुढीचे, परंपरेचे अज्ञानामुळे ग्रामीण समाज कसा बरबटलेला आहे याचे रूप दर्शवतात. त्यांच्या करुण व गंभीर कथा साहित्याला वळण देणाऱ्या ठरतात. मानवी मनाची गंभीरता व या विविधतेचे चित्रण करतात. विनोदी कथातून समाजातील व्यंगावर भ्रष्टाचारावर त्यांनी नेमके बोट ठेवले आहे आणि या विनोदी कथेमुळेच त्यांचा एक वाचक वर्ग बनला आहे. पती-पत्नी, वडील-मुलगा, आई-मुलगी, भाऊ-भाऊ, चुलता-पुतण्या, सासू-सुना, नणंद-भावजय, जावा-जावा, दीर-भावजय इत्यादी नातेसंबंध कथेत मांडतात. शंकर पाटलांची कथा स्त्रीसंबंधी नणंद, कारभारणी, माता, भावजय, या नात्यांनी आलेली आहे. पुरुषसत्ताक पद्धतीत गुंतलेली अबोल, कष्टाळू, संकटे, झेलणारी स्त्री शंकर पाटील यांनी मांडली आहे.

ग्रामीण जीवनाची दु:खे सामुहिकरित्या एखाद्या कथेत व्यक्ती बरोबर सांगताना नकळत येऊन जातात. पाणी रोगराई, पाऊस यांच्यापासून मिळणारे ग्रामीण माणसाचे दु:ख कथेत मांडतात. त्यांच्या'निसर्गकथा' मध्ये प्राणी, पाऊस, ऊन, शेतीचे वर्णन येऊन जाते. त्यांची

ग्रामीणतेचे रूप उलगडणारी कथा आहे. 'आभाळ', 'वळीव', 'भूल' या कथातून नकळत निसर्ग येताना दिसून येतो.

शंकर पाटील यांच्या कथेतील स्त्री जीवनाचे चित्रण ह्या तिसऱ्या प्रकरणामध्ये कथेत आलेल्या स्त्रियांच्या रूपाबरोबर त्यांच्या मनाची होणारी वाताहात यांचा विवेचनात्मक अभ्यास केला आहे. त्याबरोबर शंकर पाटील यांच्या कथेआधी व नंतरच्या 'ग्रामीणकथा' लेखकांचा थोडक्यात आढावा घेतला आहे.

माडगूळकरांनी ग्रामीण कथेत माण देशाच्या कथा लिहिताना गावातील स्त्री सहज मांडली. रा. रं. बोराडे, उद्धव शेळके, सुखटणकर, मधुमंगेश कर्णिक, आनंद यादव, द. ता. भोसले, महादेव मोरे इ. या लेखकांनी स्त्रीची ओढातान, मूकवेदना, सोशिकता, भांडकुदळ स्त्री, वेश्या, देवदासी, जोगतिणी या स्वरूपाच्या स्थितीत स्त्रियांची दुःखे, सुखे या लेखकांनी चित्रित केले आहे. शंकर पाटील यांनी आपल्या कथेत स्त्रीची विविध रूपे मांडली आहेत. पाटील यांनी स्त्रीची नाती, भावोत्कटता कथेत केलेली दिसते. ग्रामीण जीवनातील स्त्री संवेदनशीलतेने चित्रित केलेली आहे. त्याग कष्ट, सोशिकपणा, भाबडेपणा, माया, ममता, वात्सल्य, हळवेपण, भावूकपणा, सालसता, पापभीरुता, धीरता या रूपाने संपूर्ण स्त्रीविषयक कथेत स्त्रीचे रुप मांडले आहेत. शंकर पाटील यांनी भीतीत वावरणारी स्त्री त्यांच्या या कथामध्ये आर्वजून आली आहे. भीतीत वावरणाऱ्या स्त्रीचे रूप 'कारवान' या कथेत येते. संसारिक दुःखात सापडलेली स्त्री संसारात सुखी नाही. 'खोड', 'माहेर', 'लोडणा' या कथातून संसारात दुःखी झालेली स्त्री या कथांतून शंकर पाटील चित्रित करतात. कितीही समाज सुधारला तरीसुद्धा अंधश्रद्धा जात नाही. ग्रामीण भागात स्त्रियांच्या मनात अंधश्रद्धा जास्त करून भरलेली दिसते. याची प्रचिती

अंधश्रद्धेतील स्त्री या रूपात शंकर पाटील 'आतडं' या कथेत साकारतात. पती-पत्नी या नात्यात पतीवर अलोट प्रेम करणारी स्त्री 'दसरा', 'आहेर', 'करवत' या कथेमध्ये येताना दिसते. पुरुषव्यवस्थेत दडपलेली स्त्री 'सारवण', 'नवरा', 'पात' या कथातून आजारी असताना त्यांना काम लावणे, आजारपणात काळजी न घेणे, बाप वारला तरी त्याच्या मातीला न जाऊ देणारे नवरे अशी पुरुषाच्या अधिकारात दडपलेली स्त्री शंकर पाटील यांनी मांडली आहे.

दु:ख, कष्ट हा शंकर पाटील यांच्या कथेतील स्त्रीचा मुख्य भाग दिसतो. 'नवरा' या कथेत कष्ट झेलणारी, कष्ट करताना तिची झालेली मन:स्थिती, संसार सांभाळण्यासाठी झालेली मनाची तयारी करणारी स्त्री दिसते. प्रसुतीसमयीच्या मानसिक वेदना सहन करणारी स्त्री, चांभाराचा भागूने याच वेदनतून निसटण्याचा केलेला प्रयत्न, रत्नानी केलेली मदत, शारीरिक व मानसिक वेदना सहन करणारी स्त्री 'वेणा' या कथेत आली आहे. शिकलेली स्त्री ही अजूनसुद्धा ग्रामीण भागात औत्सुकाचा विषय ठरते. त्या बरोबर 'बैदा', 'बाभळी', 'जोडणी' या कथातून कामव्यवहार रूपात दिसणारी स्त्री व अभिलाषा रुपातील स्त्री पाटील यांनी चित्रित केली आहे.

रानावर प्रेम करणारी वृद्ध स्त्री 'वावटळ' या कथेत चित्रात्मक रूपाने साकारतात. सासरी दु:ख सहन करून आपल्या वडिलांविषयी कोणतीही मनात घृणा न बाळगता मृत्यूसमयी सेवा करणारी स्त्री पाटलांनी 'माहेर' व 'पात' या कथेत चित्रित केली आहे. दारिद्र्यामुळे येणारी संकटे, दु:ख, भोगावा लागणारा त्रास हा येतो. त्याप्रमाणे ह्या स्थितीतही स्त्री आपला सन्मान जागृत ठेवणारी स्त्री तर दुसऱ्या बाजूला साध लुगडं सुद्धा नेसायला नाही. धोतर नेसून निऱ्या पाडताना फाटलेलं धोतर अब्रु जाईल या भावनेने ती बोंब मारते. अशा अवस्थेत लाज जपणारी स्त्री 'मागंण', 'चिंधी', 'पाहुणी', या कथांतून चित्रित झाली आहे. स्थांनातरण, हस्तांतरण करणारा

पुरुषी समाज, स्वत:च्या पत्नीला हिशोबी लावणारा व स्त्रीला उपभोग वस्तू समजणारे पुरुष अशा पद्धतीमध्ये आलेली स्त्री शंकर पाटील यांच्या कथातून वारंवार येताना दिसते. मुलाच्या लग्नात मानपान व्यवस्थित झालेला नाही म्हणून वेगळा हट्ट धरणारी 'अडसर' या कथेत शंकर पाटील चित्रण करतात.

चौथ्या प्रकरणात शंकर पाटील यांच्या कथेची भाषा विविध मुद्यांच्या रूपाने पाहिली आहे. साहित्यातील भाषेचे स्थान भाषा साहित्यामध्ये साधन म्हणून तर कधी माध्यम वापरतात. लेखकाला साहित्यात जो विचार, भावना अनुभव स्वभाव व्यक्त करावयाचा आहे. तो भाषेद्वारेच व्यक्त करतो. त्यामुळे त्याला भाषेला स्थान आहे. साहित्याची भाषा निबंधात प्राय: साधन, कादंबरीत साधन तर नाटकात साधन व माध्यम म्हणून येते. साहित्याची भाषा साधी सोपी, सरळ असल्याने अलंकाराने ती साहित्यात आपले स्थान वेगळे निर्माण करते. व्यवहारभाषा आणि साहित्यिक भाषा यांच्यात फरक आहे. व्यवहारी भाषा आणि साहित्य भाषा यांचा एकमेकाशी येणारा संबंध संदेश वहन या पद्धतीत येतो. शंकर पाटील यांनी भाषेचा उपयोग ग्रामीण जीवनाचा वातावरण, प्रसंग या पद्धतीमध्ये कथीत केला आहे. कथेमध्ये येणारी पात्रे 'स्त्री मनाची चित्रण करणारी भाषा व व्यक्ती स्वभावानुसार आपल्या कथेत भाषा साजेशी मांडताना जाणवते. त्यांच्या कथेतील प्रसंग जसा असेल तसा भाषा वापरतात. त्यांच्या कथेतील वातावरण चित्रण करणारी भाषा कथेचा आशय बनवते. पावसाळी वातावरण, उन्हाळी वातावरण याबरोबर एकांताचे वातावरण कथेत आलेल्या प्रसंगानुसार निर्माण झालेले वातावरण याविषयीची भाषा मात्र प्रकटणारी वाटते. भावभावनांचा संबंध ग्रामीण संस्कृतीत दिसतो. तसी भावभावनांचा संबंध प्रकट करणारी भाषा पाटील यांच्या कथेत येते.

कथेचे वेगळेपण म्हणजे ग्रामीण ढंगाची भाषा हे होय. जडण घडण करताना ग्रामीण ढंगाची भाषा प्रभावीपणे कथेत येते. अस्सल ग्रामीण बोलीचा या ग्रामीण ढंगाचा भाषेचा उल्लेख पाटील यांच्या कथेत येते. कर्नाटक व महाराष्ट्र परिसरातील सीमेवर असणारी गावे कागल, निपाणी, तारदाळ, कोडोली येथील परिसरातील कथा असल्यामुळे पाटील कन्नड शब्द, संवाद बोली मराठी व कन्नड भाषेतील मिश्रीत स्वभाव आपल्या कथेच्या भाषेत मांडतात.

म्हणी, वाक्‌प्रचार यांचा उपयोग शंकर पाटील अतिशय सुंदर रित्या मार्मिकपणे वापर केला आहे. म्हणी, वाक्‌प्रचारांचा वापर कथेतील पात्रांच्या तोंडी येणाऱ्या जशास तशा मांडतात. म्हणींचा वाक्‌प्रचारांचा वापर स्त्रियांच्या तोंडीसुद्धा आढळतो. म्हणी वाक्‌प्रचारामुळे साहित्य दर्जेदार वाटते. याप्रकारे समाजात घडणाऱ्या बारीक सारीक गोष्टीकडे शंकर पाटील आवर्जून उल्लेख केल्याने त्यांच्या भाषेचे वेगळेपण म्हणावे लागते. संवादाची भाषा या प्रकरणात तितकेच महत्त्व आहे. कथेमध्ये येणारी वेगवेगळी पात्रे यांचे संवाद तसे मांडण्याची शैली लेखकाला अवगत झाली तर साहित्याचा दर्जा वेगळा होतो. यामुळे कथेला जिवंतपणा येतो. शंकर पाटील यांच्या कथा ग्रामीण कथा असल्याने त्यांच्या ग्रामीण माणसांचे संवाद अधिक दिसून येतात. विविध प्रसंग व्यक्तींच्या मनाची होणारी उलाघाल, असफलता व्यक्त करण्यासाठी त्याचा उपयोग केला आहे. कथेतील पात्रे ही जशी आहेत तसतसे त्यांच्या वर्तनामानुसार राहणीमानानुसार अशी भाषा मांडली आहे. व्यक्तिमनाचे प्रकटीकरणाचे बोल संवाद कथेतून दिसून येतात.

शंकर पाटील यांच्या कथालेखनाचे एक वैशिष्ट्य म्हणजे त्यांची भाषा आहे. ग्रामीण समाजाची दु:खे त्यांनी ग्रामीण बोलीतच मांडली आहेत. कथेतील निवेदनाची भाषा ही प्रथमपुरुषी, तृतीयपुरुषी मध्ये कलात्मक पद्धतीने कुशलतेने मांडली आहे. निवेदन कधी हकिकत,

वृतांत कथनामुळे त्यांची भाषा प्रत्ययकारी होताना दिसते. कथेला रंगतपणा आणण्याचे, एकाचवेळी सरळ त्या विषयाची भाषेत मांडणी करतात. पाटील यांच्या कथेतील भाषाही अस्सल ग्रामीण वास्तवाची भान ठेवणारी आहे. कथांचा विषय अनेक असताना निवदन भाषेत मोलाची दिसते.

शंकर पाटील यांच्या कथांचा समाजातील वेगवेगळ्या रूढी, परंपरा यांच्यात बदल झाला आहे. ग्रामीण साहित्यात त्याचे कितपत स्थान आहे हे दिसते. त्यांची लेखनशैली, भाषाशैली, विनोद मांडण्याची पद्धत ही वाचकावर छाप पाडते. कथेतील स्त्रीबरोबर त्यांच्या कथांची शीर्षकही न कळत समजून जाताना दिसतात.

एकंदर शंकर पाटील यांच्या कथेतील स्त्री जीवनाचे चित्रण त्यांच्या कथांच्या आधारे अभ्यास वरील पद्धतीने केला आहे.

# संदर्भग्रंथ - सूची


| | | |
|---|---|---|
| १. | कोत्तापल्ले, नागनाथ | 'ग्रामीण साहित्य, स्वरूप आणि शोध' |
| २. | यादव, आनंद | 'ग्रामीण साहित्य, स्वरूप आणि समस्या' |
| ३. | पवार, गो.मा. | 'साहित्यमुल्य आणि अभिरूची' |
| ४. | जोशी, प्र.न. | 'आदर्श मराठी शब्दकोश' |
| ५. | फडके, ना.सी. | 'लघुकथा मंत्र आणि तंत्र' |
| ६. | कुलकर्णी, दा.वि. | 'मराठी कथा: स्वरूप आणि आस्वाद' |
| ७. | माडगुळकर, अंबादास व खांडेकर, सुर्यकांत | 'मराठी ग्रामीण कथा' |
| ८. | देशपांडे, अ.ना. | 'आधुनिक मराठी वाङ्.मयाचा इतिहास' |
| ९. | प्रा. हातकणगंलेकर, म.द. पवार, गो.मा.(संपा.) | 'मराठी साहित्य: प्रेरणा व स्वरूप' |
| १०. | हातकणंगलेकर, म.द. | 'ग्रामीण कथा: आणि परिसर' |
| ११. | फडके, ना.सी. | 'प्रतिभासाधन' |
| १२. | डॉ. व्यवहारे, शरद | 'लोकसाहित्य; उद्‌गम आणि विकास' |


## नियतकालिके


| | | |
|---|---|---|
| १. | कुलकर्णी, मधू | 'महाराष्ट्र साहित्य' |
| २. | पवार, गो.मा. | 'ग्रामीण संवेदनशिलता' 'सकाळ' (रविवार पूरवणी) पुणे १ ऑगस्ट १९८१ |
| ३. | नलगे, चंद्रकुमार (संपा.) | 'दक्षिण महाराष्ट्र साहित्य पत्रिका' कोल्हापूर ऑ. नो. डिसें. १९९१ |
| ४. | ताम्हणे ,प्रभाकर | 'ललित' जुन १९७६ |
| ५. | हातकणंगलेकर, म.द. | 'ग्रामीण साहित्य विशेषांक' 'महाराष्ट्र साहित्य पत्रिका' १९८० |
| ६. | कुलकर्णी, वा.ल. | 'जिवंत रेखीव कथा' आलोचना ऑक्टोबर १९६७ |